| योजनेचे नाव | हरीतगृह व्यवस्थापन व शेडनेट व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम |
|---|---|
| **उपक्रमाचा उद्देश** | लक्षित गटातील सदस्यांना मोफत निवासी हरीतगृह व्यवस्थापन व शेडनेट हाऊस व्यवस्थापन प्रशिक्षण देऊन स्वयं-रोजगार व रोजगार संधी निर्माण करणे |
| **उपक्रमाचे स्वरूप** | लक्षित गटातील सदस्यांसाठी हरीतगृह व्यवस्थापन प्रशिक्षण आयोजित करणे. |
| **प्रशिक्षणाचे ठिकाण** | पात्र लक्षित गटातील सदस्यांना राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (NIPHT) तळेगाव दाभाडे येथे ५ दिवस प्रशिक्षण देण्यात येईल. |
| **लाभार्थी पात्रता** | १. : या योजनेचा लाभ घेण्यासाठी लक्षित गटातील सदस्यांना sarthi-maharashtragov.in या वेबसाईटवर जाऊन अर्ज करणे आवश्यक आहे. अर्जदार हा खालील पात्रता पूर्ण करणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज केल्यानंतर संबंधित सारथीच्या विभागीय कार्यालयामार्फत ऑनलाईन अर्ज यांची तपासणी व छाननी करून ऑनलाईन शिफारस करतील.<br>i. अर्जदार हा महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा किंवा मराठा-कुणबी असावा.<br>ii. कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रू.८.०० लाखापेक्षा जास्त नसावे.<br>iii. सारथी, पुणे मार्फत राबविण्यात येणाऱ्या याच उपक्रमाचा या अगोदर लाभ घेतलेल्या नसावा.<br>iv. अर्जदाराचे वय किमान १८ व जास्तीत जास्त ५० वर्ष असावे.<br>v. उमेदवाराचा महाराष्ट्रामध्ये राहिवास असावा. |
| **आवश्यक कागदपत्रे** | १. ऑनलाईन अर्ज करताना अर्जदाराने खालील कागदपत्रांची Pdf करून अपलोड करणे आवश्यक आहे. अपलोड केलेली सर्व कागदपत्र सुस्पष्ट व वाचनीय असावीत.<br>i. जातीचा दाखला / (मराठा करिता  कुणबी, कुणबी-मराठा व मराठा कुणबी)<br>शाळा सोडल्याचा दाखला अथवा जातीचा दाखला (मराठा करिता)<br>ii. नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र /EWS प्रमाणपत्र / तहसिलदार यांचा मागील तीन वर्षाचे वार्षिक उत्पन्न रुपये ८.०० लाख |

| | |
|---|---|
| | रुपयांपेक्षा जास्त नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (Income Certificate)<br>iii. आधार कार्ड, हमीपत्र, २ पासपोर्ट आकाराचे रंगीत फोटो<br>iv. जन्म दाखला अथवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र<br>v. राहिवासी प्रमाणपत्र / ७/१२ उतारा |
| **लाभार्थी निवड प्रक्रिया:** | i. लाभाकरिता ऑनलाईन अर्ज भरण्या करिता जाहिरात सारथीचे संकेत स्थळावर व राज्यातील वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध केली जाईल.<br>ii. प्रथम येणाऱ्या पात्र अर्जदारांची निवड प्राधान्यांने करण्यात येईल.<br>iii. प्रशिक्षण वर्गाच्या क्षमतेनुसार लाभार्थींना प्रशिक्षणाची तारीख व निवडीबाबत कळविण्यात येईल.<br>iv. कुटुंबातील जास्तीत जास्त एकच सदस्यांची प्रशिक्षणाकरिता निवड केली जाईल.<br>v. सदर प्रशिक्षण ही मोफत राहील. |
| **लाभाचे स्वरूप** | राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (NIPHT) तळेगाव दाभाडे, पुणे या संस्थेबरोबर केलेल्या सामंजस्य करार नुसार ०५ दिवसीय निवासी प्रशिक्षणासाठी निवासी शुल्क म्हणून प्रती प्रशिक्षणार्थी रु.७५००/- प्रशिक्षण संस्थेस अदा केले जाईल या प्रशिक्षण शुल्क मध्ये एक वेळेचा नाष्टा, दोन वेळेचा चहा आणि दोन वेळेचे जेवण व क्षेत्र भेटीचा समावेश असेल. प्रशिक्षण यशस्वी रित्या पुर्ण झाल्यानंतर आणि प्रशिक्षण संस्थेकडून देयक प्राप्त झाल्यानंतर प्रशिक्षण संस्थेस अदा केले जाईल. विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारचे शुल्क भरण्याची आवश्यकता नसून त्यांना हे प्रशिक्षण मोफत आहे. |
| **अपात्रतेचे निकष** | i. कागदपत्रे अपुर्ण असणे व विहित मुदतीत सादर न करणे.<br>ii. ऑनलाईन अर्ज भरताना खोटी किंवा चुकीची किंवा अपूर्ण माहिती भरणे.<br>iii. हमीपत्रातील नियमांचे उल्लंघन केल्यास<br>निवड प्रक्रिया, आर्थिक सहाय्याचे स्वरूप निश्चित करण्याचा अंतिम अधिकार हा मा. व्यवस्थापकीय संचालक, सारथी, पुणे यांच्याकडे राहील. |